# उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२० /२०२४ दि. २६/१०/२०२४

## "वाहतूक नियंत्रण अधिसूचना"

ज्याअर्थी उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील उल्हासनगर कॅम्प नं. २ व ३ मधील नेहरू चौक ते शिरू चौक दरम्यान रस्त्यावर मुख्य बाजारपेठ असल्यामुळे दिपावली सणानिमित्त दिनांक २४/१०/२०२४ ते दिनांक ०२/११/२०२४ रोजी पावेतो सदर परिसरात नागरिकांची खरेदीसाठी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. याकरीता दिनांक २४/१०/२०२४ ते दिनांक ०२/११/२०२४ रोजी रोजी दुपारी १३:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो सदर परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होवू नये व वाहतूक सुरळीत वं सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| प्रवेश बंद :– | नेहरू चौका कडून शिरू चौक कडे जाणाऱ्या दुचाकी वगळुन इतर सर्व प्रकारच्या वाहनांना नेहरू चौक येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग :– | सदरची वाहने नेहरू चौक येथून देवी भवानी चौक, गोल मैदान येथून उल्हासनगर नं. १ मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद :– | पटेल मार्ट कडुन नेहरू चौका कडे जाणाऱ्या दुचाकी वगळुन इतर सर्व प्रकारच्या वाहनांना पटेल मार्ट येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग :– | सदरची पटेल मार्ट कडुन नेहरु चौककडे जाणारी वाहने ही हिरा मॅरेज येथुन मधुबन चौक मार्गे – गोल मैदान मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदरची अधिसूचना दि. २४/१०/२०२४ ते दि. ०२/११/२०२४ रोजी पर्यंत दुपारी १३:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील इतर वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

- मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
- मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
- मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, विठ्ठलवाडी.
– नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर.
– ठाणे पोलीस पत्रक.

प्रत – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग/पोनि उल्हासनगर वाहतूक उपविभाग.
२/– उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधित अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner